मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या 97 जुन्या वाहनांचा लिलाव

## जुन्या वाहनांच्या लिलावातून पिंपरी-चिंचवड महापालिकेला 59 लाख महसूल

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी सामाजिक सहाय्य योजना २०२२-२३ अंतर्गत राज्य शासनाच्या मालकीची १५ वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान असणारी वाहने टप्प्याटप्प्याने निकामी करण्याच्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या ९७ वाहनांचा लिलाव करण्यात आला. या लिलावाद्वारे महापालिकेस ५९ लाख २५ हजार रुपये महसूल प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या एमएसटीसी (धातू भंगार व्यापार महामंडळ), मुंबई या संस्थेमार्फत ऑनलाईन पद्धतीने हा लिलाव पार पडला. या लिलावामध्ये कार, टाटा सुमो तसेच इतर अवजड वाहनांचा समावेश होता. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड यांनी ९७ वाहनांची तपासणी करून त्यांची लघुत्तम किंमत ४९ लाख ४५ हजार रुपये निश्चित केली होती. मात्र लिलाव प्रक्रियेद्वारे महापालिकेस तब्बल ५९ लाख २५ हजार रुपये महसूल प्राप्त झाला, जो निश्चित लघुत्तम रकमेपेक्षा ९ लाख ८० हजार रुपये (१९.८२ टक्के) अधिक आहे.

या लिलावात ९७ वाहनांची पाच गटांमध्ये विभागणी करण्यात आली होती. या सर्व गटांची विक्री यशस्वीरित्या पार पडली. प्राप्त रकमेमधून २५ टक्के रक्कम एमएसटीसी यांच्याकडे जमा केल्यानंतर विक्री आदेश निर्गमित केला जाणार असून उर्वरित ७५ टक्के रक्कम महापालिकेकडे जमा झाल्यानंतर संबंधित बोलीदारांना वाहनांचे वितरण करण्यात येणार आहे.



> महापालिकेच्या वाहन लिलाव प्रक्रियेमुळे केवळ जुन्या वाहनांचा योग्य पुनर्वापर झाला नाही, तर महापालिकेस अपेक्षेपेक्षा जास्त महसूल प्राप्त झाला आहे. ही प्रक्रिया भविष्यातही नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने राबवण्यात येईल, जेणेकरून महानगरपालिकेच्या मालमत्तेचा योग्य विनियोग होईल आणि नागरी सुविधांसाठी अधिकचा निधी उभारला जाईल.
>
> **- चंद्रकांत इंदलकर, अतिरिक्त आयुक्त (३), पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# 50 हजारांना मुलगा न दिल्याने पठ्ठ्याने केले अपहरण

## अपहृत बालकाची दोन तासांत सुटका : पिंपरी चिंचवड पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाची कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

५० हजार रुपयांमध्ये मुलगा विकत न दिल्याने त्याचे अपहरण केल्याची घटना पिंपरी-चिंचवडमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी अवघ्या काही तासातच अपहरणकर्त्याकडून आठ वर्षीय चिमुकल्याची सुटका करण्यात खंडणी विरोधी पथक आणि रेल्वे सुरक्षा बलाला यश आलं आहे. ३१ मार्च रोजी चिंचवडमधून ओळखीच्या व्यक्तीने आठ वर्षीय चिमुकल्याचे अपहरण केल्याची तक्रार चिंचवड पोलीस ठाण्यात देण्यात आली होती.

या प्रकरणी १ एप्रिल रोजी चिंचवड पोलिस ठाण्यात महिलेने तक्रार नोंदवली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या मदतीने अपहरणकर्त्या मुलाची सुखरूप सुटका करून आईच्या स्वाधीन केलं आहे. गजानन सुपडा पानपाटील असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गजानन पानपाटील चार दिवसांपूर्वी चिंचवडमध्ये ओळखीच्या व्यक्तीकडे आला होता. आरोपीने त्यांच्या आठ वर्षीय मुलासोबत चॉकलेट, बिस्किट देऊन जवळीक साधली. मुलगा आरोपीकडे जायचा. याच दरम्यान ओळखीच्या व्यक्तीच्या पत्नीला तुझा आठ वर्षाचा मुलगा पन्नास हजारांमध्ये विकत दे अशी मागणी केली. महिलेने मुलगा देण्यास नकार दिला. तरी देखील आरोपी आठ वर्षाच्या मुलासाठी हट्ट करत होता. ३१ मार्च रोजी पती-पत्नी कामाला गेल्यानंतर आठ वर्षीय मुलाचे आरोपी गजानन पानपाटीलने अपहरण करत थेट चाळीसगाव गाठलं.

याबाबत पोलिसांना माहिती मिळताच खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांनी सूत्र हलवली. भुसावळ पोलीस, रेल्वे सुरक्षा बल, चाळीसगाव पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधून अपहरणकर्ता गजाननचे मुलासह सीसीटीव्ही फुटेज पाठवले. अखेर आरोपीला चाळीसगावमध्ये रेल्वेतून ताब्यात घेण्यात आले. रेल्वे सुरक्षा बल च्या मदतीने आरोपी पर्यंत पिंपरी- चिंचवड पोहचले. ५० हजार ते एक लाख रुपयांना आठ वर्षीय मुलगा विकत न दिल्याने गजानन पानपाटील याने अपहरण केल्याची कबूल पोलिसांना दिली आहे. गजानन पानपाटील याला दोन मुलं आहेत. त्यामुळे अपहरण करून घेऊन जाणारा मुलगा कुणाला द्यायचा होता. की, विक्री करायचा होता?. याबाबत पोलीस तपास करत आहेत.

# मिळकतकराच्या बिलांचे वाटप 1 मे पासून

## पुणे महानगरपालिकेच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना चालू आर्थिक वर्षाच्या (२०२५-२६) मिळकतकर बिलांचे वाटप एक मे पासून सुरू केले जाणार आहे. निवासी मिळकतींना ४० टक्के सवलत देण्यासाठी महापालिकेकडून भरून घेण्यात आलेल्या पीटी-३ अर्जाची छाननी करून त्याच्या नोंदी प्रलंबित असल्याने १ एप्रिलपासून बिलांचे वाटप करणे अशक्य आहे. त्यामुळे एक मे पासून नागरिकांना बिले दिली जातील, असे महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या उपायुक्त प्रतिभा पाटील यांनी सांगितले. नागरिकांना ३० जूनपर्यंत पाच ते दहा टक्के सवलतीचा फायदा घेऊन ३० जूनपर्यंत मिळकतकर भरता येणार असल्याचेही पाटील यांनी स्पष्ट केले.



महापालिकेचे आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर एक एप्रिलपासून मिळकतकरदारांना बिलांचे वाटप केले जाते. त्यानंतर ३१ मे पर्यंत महापालिकेने जाहीर केलेल्या योजनांचा फायदा घेऊन नागरिकांना सर्वसाधारण करात पाच ते दहा टक्के सवलतीचा फायदा घेत मिळकतकर भरता येतो. ज्या मिळकतींमध्ये जागामालक स्वत: राहत असतील अशा नागरिकांना राज्य सरकारच्या आदेशानुसार ४० टक्के सवलत दिली जाते. यासाठीचे पीटी-३ क्रमांकाचे अर्ज महापालिकेने नागरिकांकडून भरून घेतले आहेत. सर्वसाधारण दीड ते पावणेदोन लाख अर्ज महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांकडे नागरिकांनी भरून दिलेले आहे.

> नागरिकांना ४० टक्के सवलत देण्याचे अर्ज प्रलंबित असल्याने एक मे पासून मिळकतकराची बिले दिली जाणार आहेत. नागरिकांनी सवलतीचा फायदा घेऊन वेळेत मिळकतकर भरावा.
>
> **- प्रतिभा पाटील, उपायुक्त मिळकतकर विभाग, पुणे महापालिका.**

महापालिकेच्या मिळकतकर विभागाकडे मनुष्यबळ नसल्याने याच्या नोंदी करणे अद्यापही बाकी आहे. त्यातच गेल्या दोन महिन्यांपासून मिळकतकर विभागातील कर्मचारी उत्पन्नवाढीच्या कामात अडकल्याने हे काम रखडले आहे. प्रशासनाने जुन्याच माहितीच्या आधारे बिले काढल्यास नागरिकांना त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी महापालिकेत हेलपाटे मारावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आलेल्या अर्जांची तपासणी करून त्याच्या नोंदी करून त्यानंतरच बिले काढण्याचा निर्णय मिळकतकर विभागाने घेतला आहे. त्यामुळे एका महिन्यात ही संपूर्ण कामे पूर्ण करून एक मे पासून बिलांचे वाटप सुरू केले जाणार आहे. यासाठी महापालिका आयुक्तांची मान्यता देखील घेण्यात आल्याचे उपायुक्त पाटील यांनी सांगितले.

# पीएमआरडीए विकास आराखडा अखेर रद्द

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्णय : नियोजनाची पुन्हा शून्यापासून सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सहा हजार चौरस किलोमीटर परिसराचा प्रारूप विकास आराखडा (डीपी) अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केला आहे. गेल्या आठ वर्षांहून अधिक काळ रखडलेली ही विकास आराखड्याची प्रक्रिया पुन्हा राबवावी लागणार असून, त्याचा आदेश ‘पीएमआरडीए’ला देण्यात आला आहे. नव्याने आराखड्याची प्रक्रिया करताना रस्ते, आरक्षण आणि इतर झोन निश्चित करण्यासाठी आणखी विलंब होण्याची शक्यता आहे.



पुणे जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी २०१५मध्ये ‘पीएमआरडीए’ची स्थापना करण्यात आली. २ ऑगस्ट २०२१ ला हा प्रारूप विकास आराखडा तयार करून जाहीर करण्यात आला. त्यावर तब्बल ६७ हजार नागरिकांनी हरकती आणि सूचना दाखल केल्या. या हरकतींवरील सुनावणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम आराखडा जाहीर होण्याची प्रतीक्षा असतानाच, विकास आराखड्याच्या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित करून, त्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. ऑक्टोबर २०२२ पासून या विकास आराखड्याबाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्यास उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने ही सर्व प्रक्रियाच ठप्प झाली. न्यायालयात हे प्रकरण निकाली निघत नसल्याने अखेर हा आराखडाच रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असल्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘पीएमआरडीए’ला दिल्या आहेत. प्रारूप आराखडा रद्द केल्याची माहिती उच्च न्यायालयापुढे सादर करावी, असे निर्देश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या डीपी विरोधातील याचिका निकाली निघतील, अशी अपेक्षा आहे.

### नक्की काय साधले?

» राज्य सरकार आणि नगर विकास विभागाने त्यासाठीची प्रक्रिया योग्य पद्धतीने आणि वेळेत पूर्ण केली नसल्यानेच संपूर्ण आराखडाच रद्द करण्याची नामुष्की सरकारवर ओढवली आहे. भविष्याचा वेध घेऊन प्राधिकरणाकडून केला जाणारा हा आराखडाच संपूर्ण रद्द झाल्याने नियोजनाची सुरुवात पुन्हा शून्यापासून करावी लागणार आहे.

> विकास आराखड्याला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध होता. शेतकऱ्यांचे होणारे नुकसान लक्षात न घेता आरक्षणे टाकण्यात आल्याने अनेक शेतकरी भूमिहीन होणार होते. तर रस्त्यांच्या आरक्षणामध्ये अनेकांची घरे जात असल्याने त्यांचाही विरोध होता. या विकास आराखड्याच्या विरोधात मी न्यायालयात याचिका दाखल केली होती.
>
> **- वसंत भसे, सदस्य, पीएमआरडीए.**

# महापालिकेच्या नोटीशीला 361 रुग्णालयांकडून केराची टोपली

## केवळ 72 रुग्णालयांनाच फायर एनओसी; 190 रुग्णालयांकडून प्रस्ताव दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिल्लीतील रुग्णालयात झालेल्या अग्नितांडवानंतर पिंपरी चिंचवड शहरतील 62र्3 रूग्णालयांना अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत नोटीस देण्यात आल्या. त्यापैकी 361 रुग्णालयांची महापालिकेच्या नोटीशीला केराची टोपली दाखविली आहे. केवळ 72 रुग्णालयांनी फायर एनओसी घेतली आहे. तर 190 रुग्णालयांची फायर एनओसीसाठी प्रस्ताव दाखविला आहे.

दिल्लीतील एका रुग्णालयाला लागलेल्या आगीत सहाहून अधिक बालकांचा होरपळून मृत्यू झाला.या घटनेची गंभीर दखल महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी घेतली. त्यानंतर वैद्यकिय विभाग आणि अग्निशामक विभागाला शहरातील सर्व रुग्णालयांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करण्यास सांगितले. वैद्यकिय विभागाने शहरातील 623 रुग्णालयांची यादी अग्निशामक विभागाकडे सुपूर्द केली. त्यानंतर अग्निशामक विभागाने या सर्व रुग्णालयांना अग्निरोध यंत्रणा बसविण्याबाबत नोटीस दिली. या नोटीशीला बहुतांश रुग्णालयांनी केराची टोपली दाखविली. त्यानंतर अग्निशामक विभागाने त्यांना ठराविक कालावधीनंतर नोटीस क्रमांक एक आणि त्यानंतर नोटीस क्रमांक दोन दिल्या.

पत्राच्या 15 दिवसानंतर संबंधित रुग्णालयास प्रथम नोटीस पाठविण्यात आली. या नोटीशीला 10 दिवसांची मुदत देण्यात आली. दिलेल्या मुदतीत काहीच कार्यवाही न केल्यास पुन्हा नोटीस क्रमांक दोन पाठविण्यात आली आहे. या नोटीशीनंतर सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. नोटीसनंतरही अग्निरोधक यंत्रणेबाबत काहीच कार्यवाही न केल्यास प्रसंगी महापालिका संबंधित रुग्णालय सील करू शकते. तसेच रुग्णालयाचा वार्षिक परवान्याचे नुतनीकरणही करणार नाही. मात्र या दोन्हीपैकी महापालिका कोणती कारवाई करणार की केवळ कागदी घोडे नाचविणार, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेने दिलेले पत्र आणि दोन नोटीशींची दखल काही रुग्णालयांची घेतली व रुग्णालयात अग्निरोधक यंत्रणा बसवून घेतली. आत्तापर्यंत शहरातील 72 रुग्णालयांना अग्निशामक विभागाने फायर एनओसी दिली आहे. तसेच 190 रुग्णालयांनी फायर एनओसीसाठी अर्ज केला आहे. मात्र अग्निशामक यंत्रणांनी केलेल्या पाहणीत त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत. या त्रूटी दूर केल्यावर महापालिकेकडून त्यांना फायर एनओसी दिली जाणार आहेत. मात्र 42 टक्के म्हणजे 361 रुग्णालयांनी अग्निशामक विभागाच्या नोटीशींना केराची टोपली दाखविली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन रुग्णांच्या जिवाशी खेळणा-या या रुग्णालयांबाबत कोणती कारवाई करणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




### महापालिका काय कारवाई करू शकते?

» रुग्णांच्या जिवाशी खेळणा-या रुग्णालयांना महापालिकेने दिलेले पत्र आणि दोन नोटीसनंतरही अग्निरोधक यंत्रणेबाबत काहीच कार्यवाही न केल्यास प्रसंगी महापालिका संबंधित रुग्णालय सील करू शकते. तसेच रुग्णालयाचा वार्षिक परवान्याचे नुतनीकरणही करणार नाही. मात्र या दोन्हीपैकी महापालिका कोणती कारवाई करणार की केवळ कागदी घोडे नाचविणार, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

### असा आहे नोटीशींचा कालावधी

» महापालिकेकडून संबंधित रुग्णालयांना एक पत्र पाठवून रुग्णालयात अग्निरोधक यंत्रणा बसविण्याबाबत कळविण्यात आले होते. या पत्राच्या 15 दिवसानंतर संबंधित रुग्णालयास प्रथम नोटीस पाठविण्यात आली. या नोटीशीला 10 दिवसांची मुदत देण्यात आली. दिलेल्या मुदतीत काहीच कार्यवाही न केल्यास पुन्हा नोटीस क्रमांक दोन पाठविण्यात आली आहे. या नोटीशीनंतर सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

# महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून ऐन सणासुदीत 1,020 मालमत्तांचे नळ कनेक्शन केले खंडीत


## निवासी व बिगरनिवासी बांधकामांवर कारवाई करत नळ कनेक्शन केले खंडीत; थकबाकीदारांना कर भरण्याचे पालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून ऐन सणासुदीच्या काळात मालमत्ता कर न भरल्याने निवासी आणि बिगरनिवासी मालमत्तांचे तब्बल १,०२० नळ कनेक्शन खंडीत केले आहेत. त्यामुळे थकबाकीदारांनी लवकरात लवकर आपल्या थकीत कराचा भरणा करुन कारवाई टाळावी, असे आवाहन करसंकलन विभागाकडून केले जात आहे.

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे दोन दिवस बाकी असतानाच पिंपरी-चिंचवड महापालिकेने मालमत्ताधारकांना तत्काळ कर भरण्याचे आवाहन केले होते. करसंकलन विभागाकडून कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई सुरु आहे. ज्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरला नाही अशा मालमत्तांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येत आहे. आत्तापर्यंत तब्बल १,०६९ हून अधिक मालमत्तांवर मालमत्ता जप्तीची कारवाई केली आहे. तर सुमारे १,०२० मालमत्तांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात आले आहे. तर ४३४ मालमत्तांचा तत्काळ लिलाव करण्यात येणार आहे. दरम्यान, शहरातील नागरिकांना वारंवार आवाहन करूनही थकबाकीदारांनी मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष केले आहे. ऐन सणासुदीच्या काळामध्ये करसंकलन विभागाला कटू कारवाई करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे कर भरुन आपली कारवाई टाळा, असे आवाहन करसंकलन विभागाने केले आहे.





### रात्री 12 पर्यंत करा कराचा भरणा

» नागरिकांच्या सोयीसाठी करसंकलन विभागाने शहरातील १८ विभागीय करसंकलन कार्यालये व कॅश काउंटर्स खुली ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. सकाळी ९.४५ ते रात्री १२ पर्यंत कॅश काउंटर्स खुली असून नागरिकांनी आपला कर भरण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

> थकबाकीदारांना वारंवार आवाहन करूनही ज्या थकबाकीदारांनी अद्यापही थकीत कराचा भरणा केला नाही अशा मालमत्ता कोणत्याही क्षणी जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आत्तापर्यंत १,०६९ मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. सुमारे १,०२० मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात आले आहे. थकबाकीदारांनी आपला कराचा तात्काळ भरणा करून जप्तीची कटू कारवाई टाळावी. ज्यांचा कर थकीत आहे अशांनी तत्काळ कराचा भरणा करावा असे मी आवाहन करतो आहे.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# शेतीचा जोडधंदा तोट्याचा; भाव घटल्याने दूध उत्पादक चिंतेत

**वाढत्या पशुखाद्याच्या किमतीने दूध उत्पादन शेतकरी आता मेटाकुटीला आला आहे.,त्यामुळे गोठ्यातील गायींची संख्या आता झपाट्याने कमी होऊ लागली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

शेतीला जोडधंदा म्हणून पुरंदर तालुक्यातील शेतकरी दुधाच्या व्यवसायाकडे वळाला. या दूध धंद्यातून त्याच्या हातात चार पैसे खेळू लागले. त्यामुळे पुढे जाऊन शेतकऱ्यांच्या मुलांनी या जोड धंद्याला मुख्य व्यवसायाचे स्वरूप दिले. मोठ्या प्रमाणात गायी पालन करून डेरी फार्म चालू केले. मात्र 2019 पासून या व्यवसायाला उतरती कळा यायला लागली असून, मागील सात वर्षांमध्ये शेतकऱ्यांचा गोठा आता रिकामा होताना पाहायला मिळतो आहे. दूध दराबाबत शासनाचे असलेले धरसोड धोरण आणि शेतकऱ्यांच्या उत्पादित दुधाला मिळणारा कमी दर व वाढत्या पशुखाद्याच्या किमतीने दूध उत्पादन शेतकरी आता मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे गोठ्यातील गायींची संख्या आता झपाट्याने कमी होऊ लागली आहे.

दोन वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दुधाला 37 ते 40 रुपये भाव मिळत होता. मात्र मागील एक ते दीड वर्षांमध्ये दुधाचे भाव कमी झाले आहेत. दुधाला आता 25 रुपयांपासून ते 35 रुपयापर्यंत भाव मिळतो. शासनाने दुधाचा हमी भाव 36 रुपये जरी निश्चित केला असला तरी खासगी दूध उत्पादक कागदोपत्री दाखवत असलेल्या भावापेक्षा कमी भाव शेतकऱ्यांना देतात. अर्थात त्यासाठी एसएनएफचे कारण पुढे केल जात. मात्र दुधाची फॅट, डिग्री यामध्ये होणारा घोळ शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजला आहे.यावर नियंत्रण ठेवणारी किंवा फॅट डिग्री या मापांवर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नसतं त्यामुळे शेतकऱ्याच्या दुधाचं मूल्यांकन व्यवस्थित होत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला दिला जाणारा बाजार हा एक उपकार आहे असे डेरी चालक समजत असतात.

दुभत्या गायींना द्याव्या लागणाऱ्या खुराकाचा खर्च वाढला आहे.1750 रुपयाला 50 किलो खुराकाच पोत मिळते. गोचडीच औषध 25 रुपयाच 150 रुपये झाले आहे. जनावरांचा चार हजार रुपये पांड (एका एकर म्हणजे 20 पांड) मिळतोय. सिमेन्स सुद्धा महाग झाले आहे.त्यातच या गायींना दोन तीन वेळा सिमेन्स भरावे लागते. कारण गायी उलटण्याचे प्रमाण जास्त आहे. पूर्वी लागवड गाय तपासण्यासाठी पैसे घेत नव्हते. आता त्यासाठी 100 रुपये घेतले जातात. सरकारने 5 रुपयाने अनुदान जाहीर केले. आर्ध आले, आर्ध आलेच नाही. नंतर 7 रुपये जाहीर केले. आता देतच नाही, असे म्हणत गुळूंचे येथील शेतकरी सुधाकर निगडे यांनी खंत व्यक्त केलीय.



### जनावरांचा औषध आणि खुराकाचा खर्च वाढला

» दुभत्या गायींना द्याव्या लागणाऱ्या खुराकाचा खर्च वाढला आहे.1750 रुपयाला 50 किलो खुराकाच पोत मिळते. गोचडीच औषध 25 रुपयाच 150 रुपये झाले आहे. जनावरांचा चार हजार रुपये पांड (एका एकर म्हणजे 20 पांड) मिळतोय. सिमेन्स सुद्धा महाग झाले आहे.त्यातच या गायींना दोन तीन वेळा सिमेन्स भरावे लागते. कारण गायी उलटण्याचे प्रमाण जास्त आहे. पूर्वी लागवड गाय तपासण्यासाठी पैसे घेत नव्हते. आता त्यासाठी 100 रुपये घेतले जातात. सरकारने 5 रुपयाने अनुदान जाहीर केले. आर्ध आले, आर्ध आलेच नाही. नंतर 7 रुपये जाहीर केले. आता देतच नाही, असे म्हणत गुळूंचे येथील शेतकरी सुधाकर निगडे यांनी खंत व्यक्त केलीय.

> शासनाने सध्या 3.5 फॅट व 8.5 एसएनएफ असलेल्या दुधाचा दर 33 रुपये निश्चित केला आहे. मात्र असे असले तरी शेतकऱ्यांना हा दर परवडणारा नाही. खाद्याचे दर पोत्याला 60 रुपये कमी केले असले तरी ते फारच कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्याला किमान 40 रुपये दर मिळायला हवा. त्यातच आता शासनाने दुधाचा अनुदान बंद केले आहे. त्याचबरोबर पूर्वीच्या काळी उन्हाळ्यात आला की शासन दुधाला एक रुपया वाढवून देत होते. मात्र आता ती देखील वाढ शासनाकडून केली जात नाही. त्यामुळे दुधाला किमान 40 रुपये भाव मिळायला हवा. मात्र दूध उत्पादकांना देखील आपल्या दुधाच्या कॉलिटीकडे लक्ष द्यायला हवे.
>
> **- रोहिदास थोपटे, डेअरी चालक, नीरा**

> शासनाकडून केवळ दोन महिन्यांचे अनुदान आले त्यानंतर ते आलेच नाही. मात्र सध्या दुधाला मिळणारा भाव 25 रुपयांपासून सुरू होतो. सरकारने जर दुधाला 40 रुपये हमीभाव दिला तर हा व्यवसाय चांगला चालेल. त्यामुळे सरकारने आम्हाला अनुदान नाही दिले तरी चालेल पण हमीभाव द्यावा.
>
> **- शीतल निगडे, दूध उत्पादक, गुळूंचे**

# शिरूरमध्ये मनसे आक्रमक: बँकिंग व्यवहार मराठीतच करण्याची मागणी

**शिरूर शहरातील विविध बँकांमध्ये मराठीतून पाट्या आणि बँकिंग व्यवहार करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिरूर शहरातील विविध बँकांमध्ये मराठीतून पाट्या आणि बँकिंग व्यवहार करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. शासन निर्णयानुसार प्रशासकीय व्यवहारात मराठी भाषेचा वापर बंधनकारक असल्याने बँकांनी याचे तातडीने पालन करावे, अशी मागणी करत मनसेच्या शिष्टमंडळाने विविध बँकांना निवेदन दिले आहे.

गुढीपाडवा मेळाव्यात पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांनी बँकिंग व्यवहार मराठीतच करण्याच्या सूचना दिल्यानंतर, स्थानिक मनसैनिकांनी यावर तात्काळ अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला. त्यानुसार मनसेचे उपजिल्हाध्यक्ष महिबूब सय्यद, तालुका संघटक अविनाश घोगरे, शहर अध्यक्ष ॲड. आदित्य मैड, शहर सचिव रविराज लेंडे, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा डॉ. वैशाली साखरे, तालुका संघटक शारदा भुजबळ, मनसेचे शहर उपाध्यक्ष गौरव शिंदे, अण्णासाहेब दौंडकर, अस्लम शेख, संतोष कोठावळे आदींनी विविध बँकांसमोर घोषणाबाजी करत निवेदन दिले.

शिरूर शहरातील भारतीय स्टेट बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, कॉसमॉस बँक, कॅनरा बँक, आयडीबीआय, ॲक्सिस बँक, आयडीएफसी, पंजाब नॅशनल बँक आणि युनियन बँकेच्या शिरूरमधील शाखांमध्ये जाऊन शाखा व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्याच्या मराठी भाषा विभागाने १४ मार्च २०२४ रोजी शासन निर्णय जारी करत शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे आणि शासन अनुदानित कार्यालयांमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य केला आहे. त्यानुसार अभ्यागतांना मराठीतून सेवा देणे आणि दर्शनी भागात मराठीतून फलक लावणे बंधनकारक आहे.

मनसे कार्यकर्त्यांनी स्पष्ट शब्दांत बँक व्यवस्थापनाला इशारा दिला की, मराठी भाषेचा अवमान केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित बँकेची असेल. त्यामुळे सर्व बँकांनी तातडीने सुधारणा कराव्यात, अन्यथा मनसे अधिक तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे.



### मनसेच्या प्रमुख मागण्या

» बँकेतील भरणा पावती, कर्ज अर्ज इत्यादी कागदपत्रे मराठीत छापलेली असावीत,कर्ज मंजुरी व ना हरकत प्रमाणपत्र मराठीतून स्वीकारावेत. बँकेतील कर्मचारी ग्राहकांशी मराठीतून संवाद साधावा. ८ दिवसांत सर्व कागदपत्रे मराठीतून करण्याची अंमलबजावणी करावी. शासन निर्णय आणि रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करावे. शेतकरी आणि ग्रामीण भागातील खातेदारांना सहकार्य करावे. सर्व बँक शाखांमध्ये मराठीत सूचना फलक लावावेत.